**प्रेसनोट दिनांक ०३/०८/२०२२**

**दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडची कामगिरी**

## क्रिकेट बेटिंग (सट्टा) घेणाऱ्या आरोपीस दरोडा विरोधी पथकाकडुन अटक

मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास इंगवले, सहा. पोलीस निरीक्षक सिध्देश्वर कैलासे व पोलीस अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत गस्त करीत असताना वपोनि रामदास इंगवले यांना बातमी मिळाली की, सर्व्हे नंबर १३६, मोहननगर, चिंचवड, पुणे येथे एक इसम क्रिकेट मॅचवर बेकायदेशीर बेटींग (सट्टा) घेत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली. त्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देवुन, दरोडा विरोधी पथकाकडील सपोनि कैलासे, पोउपनिरी मंगेश भांगे व पोलीस स्टाफ असे मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन, सापळा रचुन, दिनांक ०२/०८/२०२२ रोजी रात्रौ २२:२० वा छापा टाकला असता, आरोपी नामे विनायक कृष्णा शेलार, वय ५० वर्षे, रा. शेलार बिल्डींग, दुसरा मजला, सर्व्हे नंबर १३६, शेलार चाळ, इएसआय हॉस्पीटल जवळ, मोहननगर, चिंचवड, पुणे यास ताब्यात घेतले. तो इंडिया वेस्ट इंडिज टी २० व या सामन्याचे त्याचे मोबाईल मध्ये असलेले CRICKET MAZZA, Cricket line guru या ॲपद्वारे बेटिंग घेत असल्याचे निष्पन्न झाले. त्याचेकडुन १,१४,५४०/- चे एकुण ०६ मोबाईल फोन, इंटरनेट राऊटर इत्यादी मुद्देमाल मिळुन आला. नमुद इसमांविरूध्द पिंपरी पोलीस ठाणे गुरनं ६३८/२०२२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७ चे कलम ४ व ५, इंडियन टेलीग्राफ ॲक्ट कलम २५(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे डॉ. प्रशांत अमृतकर, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रामदास इंगवले, सपोनि सिध्देश्वर कैलासे, मनिषा हाबळे, पोउपनिरी श्री. मंगेश भांगे, तसेच पोलीस अंमलदार विक्रांत गायकवाड, गणेश हिंगे, आशिष बनकर, गणेश सावंत, गणेश कोकणे, विनोद वीर, प्रविण माने, उषा दळे, नम्रता सकट व आशा लोमटे यांचे पथकाने केली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड**